# Success at Elocution Competitions






## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत शिवम माळकरचे यश

शिरोळ : प्रतिनिधी-

जयप्रकाश एज्युकेशन सोसायटीचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय पेठवडगाव यांचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या माजी आमदार नानासाहेब माने स्मृती चषक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत येथील शिवम संजय माळकर याने द्वितीय क्रमांक पटकावला. तो भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सांगलीचा विद्यार्थी असून एम.बी.ए.च्या प्रथम वर्षात शिकत आहे. त्याला रोख रक्कम, स्मृतिचषक व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या स्पर्धेत सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, पुणे, नगर, मुंबई अशा महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयाच्या स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या नामांकित स्पर्धेत शिवमने मोबाइलच्या विळख्यात हरवलेली आजची तरुणाई या विषयावर आपले विचार अत्यंत









# डॉ. घाळी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सांगलीचा शिवम माळकर विजेता

प्रतिनिधी
गडहिंग्लज

डॉ. घाळी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत शिवम माळकर (सांगली) याने विजेतेपद पटकावत ७ हजार रुपये आणि चषक जिंकले. कै. रत्नमाला घाळी राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत पार्थ भेंडेकर (पुणे) याने विजेतेपद पटकावत ४ हजार रुपये आणि चषक असे बक्षीस पटकावले. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतिश घाळी अध्यक्षस्थानी होते.

डॉ. घाळी महाविद्यालयात आयोजित केलेल्या या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, पुणे, अहमदनगर, मुंबई आदी भागातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

गडहिंग्लज : वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धेतील विजेत्यांसह पालकमंत्री हसन मुश्रीफ, डॉ. सतिश घाळी, उदय जोशी, शिवाजी भुकेले आदी.

वक्तृत्व स्पर्धेतील द्वितीय क्रमांक अमय अल्शी (मुंबई) यांनी तर तृतीय क्रमांक संघर्ष कांबळे (सरवडे) यांनी पटकावले. प्रज्ञा माळकर (सांगली), वैष्णवी पाडळे (गडहिंग्लज), अमृता सागर (गडहिंग्लज) यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. काव्य वाचन स्पर्धेत वैष्णवी पाडळे, चैतन्य कांबळे (गारगोटी) यांनी द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. रणजीत कागनकर (महागाव), गोविंद मांड (पुणे) यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. उत्स्फुर्त वक्तृत्व स्पर्धेत महेश उशीर (अहमदनगर), गोविंद मांड, अनिकेत खताळ (देऊर) यांनी प्रथम तीन क्रमांक पटकावले. यावेळी पालकमंत्री मुश्रीफ यांनी विजेत्यांचे कौतुक करत या स्पर्धेने विचारमंथनाची एक पुरोगामी परंपरा निर्माण केली आहे. त्यामुळे ही स्पर्धा राष्ट्रीय पातळीवर पोहचली पाहिजे. यासाठी दरवर्षी १ लाख रुपयाची मदत करणार असल्याचे जाहीर केले. प्राचार्य दत्ता पाटील यांनी स्वागत तर डॉ. नागनाथ मासाळ यांनी आभार मानले. उदयराव जोशी, शिवाजी भुकेले, डॉ. सरला आरबोळे, डॉ. निलेश शेळके, प्रा. महेश कदम यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

Insitute’s MBA student and elocution chamption Shivam Malkar has won prizes in 2 elocution competitions. The 1st elocution competion was organized by Jaiprakash Education Society’s Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalay, Peth Vadgaon on Thursday, 8th August 2024. Shivam Secured secured second rank in the compeition. Compeititors from Sangli, Satara, Solapur, Kolhapur, Ahmednagar, Pune and Mumbai participated in the competition.

The 2nd competition was organized by Dr. Ghali College, Gadhinglaj on Thursday, 22nd August 2024. Shivam secured 1st rank in the competition.

Director Dr. Pallavi Jamsandekar and Vice Principal Dr. Pratap Desai have congratualted Shivam on the success.